**<u>ठळक बातम्या</u>**

- वस्तू आणि सेवा कराचे सुधारित दर देशभरात लागू
- अरुणाचल प्रदेशात पाच हजार कोटींहून जास्त किंमतीच्या विकास प्रकल्पांची प्रधानमंत्र्यांच्या हस्ते पायाभरणी
- मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत झाली मेट्रो ४ च्या पहिल्या टप्प्यातली चाचणी
- शारदीय नवरात्रोत्सवाला आजपासून राज्यासह देशभरात सुरुवात

**आणि**

- जोरदार पावसामुळे राज्यात अनेक जिल्ह्यात जनजीवन विस्कळीत

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा करांमध्ये केलेल्या सुधारणा आजपासून लागू झाल्या. याअंतर्गत जीएसटीचा १२ आणि २८ टक्क्यांचा टप्पा रद्द झाला असून फक्त ५ आणि १८ टक्के अशा दोन टप्प्यांमध्येच जीएसटी आकारला जात आहे. याबद्दल अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून…

***होल्ड… व्हीसी-***

(जीएसटी दरांतल्या या सुधारणांमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल आणि मध्यमवर्ग, युवा आणि देशभरातल्या ग्राहकांना मोठा फायदा होईल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल व्यक्त केला. जीएसटीचे नवे दर म्हणजे फक्त कर नसून जीएसटी बचत उत्सव आहे, आत्मनिर्भर भारताच्या दिशेनं हे अतिशय महत्त्वाचं पाऊल आहे, असं प्रतिपादन त्यांनी केलं.

***होल्ड… बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

*जीएसटी प्रणालीत झालेल्या सुधारणा म्हणजे गरीब, युवा, शेतकरी आणि महिलांसाठी काम करण्याच्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वचनबद्धतेचं प्रतीक आहे, अशी ग्वाही केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे दिली.*

*करप्रणालीतल्या सुधारणा हे एक क्रांतिकारी पाऊल असल्याचं मत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केलं.*

***होल्ड... बाईट- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस***

*या नव्या करप्रणालीत शालेय वस्तूंवरचा जीएसटी पूर्ण रद्द करण्यात आला आहे. याबद्दल ऐकू या एका शिक्षकाची प्रातिनिधिक प्रतिक्रिया.*

***होल्ड... बाईट)***

**<><><><><>**

व्हायब्रन्ट व्हिलेज उपक्रमाच्या यशामुळे सामान्य जनतेचं आयुष्य सुलभ झालं आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं आहे. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते अरुणाचल प्रदेशाची राजधानी इटानगर इथं सुमारे ५ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विविध विकास कामांची पायाभरणी करण्यात आली , त्या वेळी ते बोलत होते.

अरुणाचल प्रदेशाचा विकास म्हणजे भाजपाच्या दुहेरी इंजिन सरकारमुळे मिळणाऱ्या दुहेरी लाभांचं उदाहरण आहे असंही ते म्हणाले. ईशान्येकडची राज्यं देशाच्या विकासाची प्रेरक शक्ती बनत आहेत, असं त्यांनी सांगितलं.

प्रधानमंत्र्यांनी आज इटानगर इथं २ मोठ्या जलविद्युत प्रकल्पांची आणि १० पायाभूत सुविधा प्रकल्पांची पायाभरणी केली.

**<><><><><>**

मेट्रो ४ च्या पहिल्या टप्प्यातली चाचणी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झाली. ही मेट्रो वडाळा,

घाटकोपर, मुलुंड, कासारवडवली, गायमुख या मार्गावरून धावणार आहे. या मार्गाची लांबी ३५ किलोमीटर असून ठाणेकरांसाठी हा मार्ग अतिशय महत्त्वाचा असल्याचा मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**होल्ड बाईट-मुख्यमंत्री बाईट होल्ड**

या मेट्रोवर एकूण ३२ स्थानके असून या प्रकल्पासाठी १६ हजार कोटी रुपये खर्च येणार आहे. हा मार्ग सुरू झाल्यानंतर वर्षाला १३ लाखांहून अधिक प्रवासी इथून प्रवास करतील, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. मोगरपाडा इथं डेपोसाठी ४५ हेक्टर जागा उपलब्ध झाली आहे. याचा फायदा मेट्रो ४, मेट्रो ४ अ तसंच मेट्रो १० आणि मेट्रो ११ साठी देखील डेपो म्हणून उपयोग केला जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

आजचा दिवस ठाणेकरांसाठी अतिशय आनंदाचा आहे, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

**(होल्ड बाईट)उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

**<><><><><>**

अहमदाबाद इथे गेल्या १२ जून रोजी झालेल्या एअर इंडियाच्या विमानाच्या अपघाताची चौकशी निष्पक्ष, पारदर्शक आहे का, हे तपासण्यासाठी आज सर्वोच्च न्यायालयाने मंजुरी दिली. तसंच, केंद्र सरकार आणि नागरी विमान वाहतूक महासंचालकांना नोटीस बजावली. या प्रकरणाची स्वतंत्र, निःपक्ष आणि जलद चौकशी करण्याची मागणी करणारी जनहित याचिका सेफ्टी मॅटर्स फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेने दाखल केली होती. त्या याचिकेवर न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एन. कोटिश्वर सिंह यांच्या पीठासमोर सुनावणी झाली. या प्रकरणाच्या स्वतंत्र चौकशीसाठी प्रतिवादींना नोटीस जारी करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. या अपघाताची विमान अपघात अन्वेषण विभागाने चौकशी केली होती. त्या

चौकशीच्या अहवालात वैमानिक जबाबदार असल्याचं नमूद केलं होतं. त्याला या याचिकेद्वारे आव्हान देण्यात आलं होतं.

**<><><><><>**

देशात शारदीय नवरात्रोत्सवाला आजपासून सुरुवात झाली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना नवरात्रोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. सर्व देशवासीयांना आरोग्य आणि सौभाग्यासाठी दुर्गामातेचे आशिर्वाद लाभो, अशी कामना त्यांनी केली. आजपासून जीएसटी बचत उत्सव सुरू होत असल्यामुळे यावर्षीचा नवरात्रोत्सव विशेष असल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

राज्यातल्या साडेतीन शक्तीपीठ ठिकाणीही घटस्थापना करण्यात आली. तुळजापूरचं तुळजाभवानी मंदिर, कोल्हापूरचं महालक्ष्मी मंदिर, नांदेड जिल्हातल्या माहुरचं रेणुका माता मंदिर तसंच वणीच्या सप्तश्रृंगी देवी मंदिरात नवरात्रोत्सवा निमित्त जय्यत तयारी करण्यात आली आहे. नाशिकच्या श्री सप्तश्रृंगी देवी मंदिरात आज पहाटे विधिवत घटस्थापना करण्यात आली. देवस्थानाच्या अध्यक्षांच्या हस्ते दागिन्यांची पूजा करून मिरवणूक काढण्यात आली आणि महापूजा करून घटस्थापना करण्यात आली.

**छत्रपती संभाजीनगर** शहरातल्या कर्णपुरा देवी यात्रेला आजपासून सुरुवात झाली. आज सकाळी देवीची महापुजा करण्यात आली.

यंदा दसरा अकराव्या दिवशी आला आहे, त्यामुळे आजपासून अकरा दिवस राज्यभरात आदिशक्तीची आराधना केली जाणार आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सेवा आणि सुशासनाचा मंत्र घेऊन सरकार परिवर्तन आणि विकासाच्या दिशेनं काम करत आहे. सेवा पर्व या विशेष मालिकेत आज जाणून घेऊ या गृहनिर्माण आणि शहर विकासात सरकारनं केलेल्या कामाबद्दल…

***होल्ड... व्हीसीः***

(देशात मेट्रो आता हे फक्त वाहतुकीचं साधन राहिलं नसून देशाच्या विकासाच्या केंद्रस्थानी असलेली जीवनवाहिनी झाली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात जगातली तिसरी सर्वात मोठं मेट्रो जोडणी भारतात उभी राहिली आहे आणि शहरी दळणवळण क्षेत्रात यामुळे सकारात्मक बदल दिसून येत आहेत. काहीच दिवसांपूर्वी कोलकाता इथं मेट्रो रेल्वे प्रकल्पांचं उद्धाटन करताना, २०१४ पासून झालेल्या मेट्रोच्या प्रगतीचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला होता.

***होल्ड... बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

*शहरी भागाचं जीवनमान उंचावण्यासाठी सर्वांना चांगलं घर उपलब्ध करून द्यायलाही गेल्या ११ वर्षांत सरकारनं प्राधान्य दिलं आहे.*
*मेट्रो सुविधा उपलब्ध करून देण्यापासून ते नागरिकांना परवडणारी घरं उपलब्ध करून देण्यापर्यंत शहरी भागातल्या नागरिकांचं जीवनमान उंचावण्यासाठी सरकार सातत्यानं काम करत आहे.)*

**<><><><><>**

राज्यात झालेल्या जोरदार पावसामुळे अनेक जिल्ह्यात जनजीवन विस्कळीत झालं आहे.

**धाराशिव** जिल्ह्यात परंडा तालुक्यातल्या साकत गावात मुसळधार पावसामुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली असून अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी **जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून परिस्थितीचा आढावा घेतला आणि** या गावात अडकलेल्या १२ नागरिकांना बाहेर काढण्यासाठी सैन्यादलाच्या हेलिकॉप्टरची व्यवस्था करण्याचे निर्देश पवार यांनी दिले.

**बीड** जिल्ह्यतल्या माजलगाव धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस झाला आहे. पावसामुळे सध्या माजलगाव धरणाचे अकरा दरवाजे उघडण्यात आले

आहेत. यामुळे नागरिकांनी नदीपात्रात किंवा नदीकाठी जाऊ नये, असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

**अहिल्यानगर** शहरासह जिल्ह्यात रात्रभर जोरदार पाऊस झाला. त्यामुळे शेतीचं मोठं नुकसान झालं आहे. पावसामुळे शेतकऱ्यांनी साठवलेला कांदा सडला आहे. तसंच शेतातल्या उभ्या पिकांचं नुकसान झालं आहे.

**पैठणचं** जायकवाडी धरण जवळपास पूर्ण भरलं आहे. सध्या सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे धरणात पाण्याची आवक मोठ्या प्रमाणात सुरू आहे. त्यामुळे धरणाचे १८ दरवाजे उघडण्यात आले आहेत.

//<><><><><>//